# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून माफक दरात प्रासंगिक करार बससेवा

पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत दिली जाणारी प्रासंगिक करार बससेवा माफक दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे. नागरीक, शाळा, महाविद्यालये यांच्या मागणीनुसार लग्न समारंभ, सहल व इतर कार्यक्रमांकरिता प्रासंगिक कराराने परिवहन महामंडळाच्या संचलन कार्यक्षेत्रापर्यंत ठराविक दराने बसेस देण्यात येतात.

सुरक्षित व सुखकर प्रवास, किफायतशीर दर ही पीएमपीएमएलच्या प्रासंगिक करार बससेवेची वैशिष्ट्ये आहेत. पीएमपीएमएल कडून प्रासंगिक करार बससेवेचे माफक दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत.

**सोमवार ते शनिवार करिताचे दर**

| अ.क्र. | तपशील | सीएनजी बसचे दर (रूपयांत) | ई-बसचे दर (रूपयांत) |
|---|---|---|---|
| १ | ८ तासांकरीता जीएसटी सह | ८४६९/- | ९९५१/- |
| २ | १६ तासांकरीता जीएसटी सह | १६९४०/- | १९९०३/- |
| ३ | प्रस्तावित दराच्या ५० टक्के याप्रमाणे सोडणे/आणणे (एकेरी खेपा) जीएसटी सह | ४२३४/- | ४९७५/- |

**रविवार करिताचे दर**

| अ.क्र. | तपशील | सीएनजी बसचे दर (रूपयांत) | ई-बसचे दर (रूपयांत) |
|---|---|---|---|
| १ | ८ तासांकरीता जीएसटी सह | ६३५२/- | ७४६३/- |
| २ | १६ तासांकरीता जीएसटी सह | १२७०५/- | १४९२७/- |
| ३ | प्रस्तावित दराच्या ५० टक्के याप्रमाणे सोडणे/आणणे (एकेरी खेपा) जीएसटी सह | ३१७६/- | ३७३१/- |

तरी पीएमपीएमएल च्या सुधारीत दरातील प्रासंगिक करार बससेवेचा लाभ सर्व शाळा, कॉलेज, नागरीक, खाजगी व आय.टी. कंपन्या, नोकरदार यांनी घ्यावा असे आवाहन परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

sd/-

**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. १५/०९/२०२३

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

sd/-

**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**